वर्ष-०७ अंक-१४ मुंबई, मंगळवार २३ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२१ पृष्ठ-४

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

PG 2 टेलरच्या टॅगवरून 'त्या' हत्येचा लागला छडा

3 → शिक्षकांनीच केला विद्यार्थिनीचा विनयभंग

तक्रारदार महिलेनेच केला खून; 'असा' लागला छडा ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी

### राजकीय मेळावे, सभा, आंदोलने यामध्ये करोनाविषयक नियमांचे पालन झाले नाही.




मुंबई : राज्यातील वाढता करोना संसर्ग रोखण्यासाठी सर्व प्रकारचे सार्वजनिक कार्यक्रम आणि आंदोलनांवर सोमवारपासून काही दिवस बंदी घालण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी केली. रुग्णवाढीची आकडेवारी आणि नागरिक शिस्तपालन करतात की नाही, हे तपासून टाळेबंदी लागू करण्याबाबत आठ-दहा दिवसांनी निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सार्वजनिक ठिकाणी गर्दी वाढत असून राजकीय, सामाजिक, धार्मिक अशा कार्यक्रमांना परवानगी मिळणार नाही. नियम न पाळणारी मंगल कार्यालये, सभागृहे, उपाहारगृहे यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. मुखपट्टी वापरा, शिस्त पाळा आणि टाळेबंदी टाळा ही त्रिसूत्री पाळा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. रुग्णसंख्या अधिक असलेल्या जिल्ह्यांमध्ये सोमवारपासून कठोर निर्बंध किंवा अशंत: टाळेबंदी लागू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सर्व शासकीय समारंभ गर्दी टाळून आणि शक्यतो दूरचित्रसंवाद माध्यमातून करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

गेल्या काही दिवसांमध्ये राज्यातील दैनंदिन रुग्णसंख्या दोन-अडीच हजारांवरून अनेक पटींनी वाढून रविवारी सात हजारांवर पोहोचली. गेल्या काही दिवसांमध्ये अनेक नागरिकांनी करोनाची साथ गेली, असे समजून मुखपट्टीचा वापर बंद केला होता. सार्वजनिक ठिकाणी गर्दी करण्यास सुरुवात केली होती. विवाह आणि अन्य समारंभ आयोजित केले गेले. मंदिरे आणि अन्य धार्मिक कार्यक्रम घेतले गेले. राजकीय मेळावे, सभा, आंदोलने यामध्ये करोनाविषयक नियमांचे पालन झाले नाही. त्यामुळे अनेक पटींनी रुग्णवाढ होत आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अमरावतीसारख्या ठिकाणी सर्वाधिक रुग्णवाढीचा याआधीचा टप्पा ओलांडला गेला आहे. ही दुसरी लाट आहे का हे काही दिवसांमध्ये समजेल. पण पाश्चात्य देशांप्रमाणे राज्यातही निर्बंध पाळण्याबाबत शिथिलता आल्याने हे घडले आहे. ब्रिटन, ब्राझील या देशांमध्ये पुन्हा टाळेबंदी लागू करण्यात आली आहे. राज्यात हे टाळायचे असेल, तर पुढील काळात मुखपट्टीचा वापर आणि इतर नियमांचे काटेकोर पालन करावेच लागेल, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

**महाराष्ट्र थांबला नाही!**

करोनाची जोरदार साथ असताना देखील महाराष्ट्र थांबला नाही. राज्यात दोन लाख कोटी रूपयांपर्यंत गुंतवणूक आणली. एमएमआरडीएच्या काही प्रकल्पांना सुरुवात झाली, पर्यटन, कृषी क्षेत्रासह विकासाची सर्व कामे सुरूच ठेवली. भूमिपूजने झाली, कृषी पंपांना वीज दिली, मी विदर्भ, ...पान २ वर...

## महाराष्ट्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव, शरद पवारांनी घेतला मोठा निर्णय



मुंबई, राज्यामध्ये पुन्हा एकदा कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात चिंतेचं वातावरण निर्माण होऊ शकतं. अशा काळात राज्यातील धार्मिक, सामाजिक, राजकीय, जत्रा, यात्रा, रद्द कराव्यात अशा स्वरूपाचं आवाहन राज्याचे ...पान २ वर...

## विनामास्क फिरले अन् 32 लाख भरले; रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, क्लब, जिमखान्यातही धडक



मुंबई : कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांच्या विरोधातील मोहीम ...पान २ वर...

## मुंबईचा नियोजनबद्ध विकास!



मुंबई : कलानगर जंक्शन येथील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या तीन मार्गिका उड्डाणपुलाच्या एका मार्गिकेचे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. या वेळी वरळी-शिवडी या उन्नत मार्गाचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

''मुंबई अनेकदा नियोजनाशिवाय वाढली आहे. अशा मुंबईमध्ये आता आखीवरेखीवपणाने विकास करत आहोत. या सुविधांचे काम नवीन शहर वसविण्यापेक्षाही कठीण आहे; पण आपले सरकार, महापालिका विकासाची पावले टाकते आहे. या विकासासाठी सरकार हे एमएमआरडीएसोबत आहे,'' असे भूमिपूजनावेळी मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) या दोन्ही प्रकल्पांचे काम सध्या सुरू आहे. कलानगर जंक्शन येथे तीन मार्गिकांच्या उड्डाणपुलाचे काम २०१७ पासून सुरू झाले. यापैकी वांद्रे-कुर्ला संकुलाकडून वांद्रे-वरळी सागरी मार्गाकडे जाणाऱ्या मार्गिकेचे लोकार्पण रविवारी झाले. उर्वरित दोन मार्गिकांचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शिवडी ते चिर्ले (नवी मुंबई) दरम्यानचा मुंबई पारबंदर प्रकल्प आणि वांद्रे-वरळी सागरी मार्ग व सागरी किनारा मार्ग या दोहोंना ...पान २ वर...

## त्रीसुत्री पाळा व लॉकडाऊन टाळा, राजेश टोपेंचे राज्यातील जनतेला कळकळीचे आवाहन




राज्यात कोरोना संसर्ग फोफावू लागल्यापासून राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे जातीने लक्ष देऊन कोरोनाविरोधातील उपाययोजना करत होते. परंतु राजेश टोपे यांना कोरोनाची लागण झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान कोरोना रुग्णांची संख्या पुन्हा वाढत असल्याने आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी राज्यातील जनतेला पत्र लिहून कोरोना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत पुन्हा वाढ झाली आहे. राज्यातील अमरावती, पुणे, नाशिक,यवतमाळमध्ये कोरोनाचा उद्रेक होत आहे. कोरोना गेलेला नाही. कोरोना पुन्हा डोके वर काढत आहे. तेव्हा पुन्हा एकदा सामुहिक लढाई लढावी लागणार आहे. असे आरोग्य मंत्री राजेश टोपेंनी ...पान २ वर...

## वाढत्या पेट्रोल, डिझेलचा परिणाम जाणवू लागला; मुंबईत रिक्षा, टॅक्सीचे भाडे वाढले



मुंबई : 100 कडे झेपावलेल्या पेट्रोल , डिझेलच्या किंमतींचा परिणाम आता बाजारावर जाणवू लागला आहे. ज्यांची वाहने नाहीत त्यांनाही आता भूर्दंड सोसावा लागणार आहे. पेट्रोल , डिझेल वाढेनात का, आमच्याकडे गाड्या कुठे आहेत म्हणणाऱ्यांसाठी वाईट बातमी आहे. कारण आता मुंबईतील रिक्षा, टॅक्सीने प्रवासी भाड्यात मोठी वाढ केली आहे. यामुळे वाढत्या इंधनाचा फटका आता सामान्य लोकांनाही बसणार आहे. ऑटो- टॅक्सीच्या कमीतकमी भाड्यामध्ये 3 रुपयांची वाढ झाली आहे. रिक्षाचे प्रारंभिक भाडे हे 18 रुपये होते. आता त्यामध्ये 3 रुपयांची वाढ झाल्याने ते 21 रुपये झाले आहे. तर काळ्यापिवळ्या...पान २ वर...

## धक्कादायक! OTT वर LIVE पॉर्न दाखवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; मुंबई पोलिसांचे शूटिंगच्याच ठिकाणी छापे




मुंबई, O T T प्लॅटफॉर्मवर वेबसीरिजसारख्या पॉर्न मूव्हीज प्रसिद्ध करणाऱ्या टोळीला मुंबई पोलिसांच्या क्राइम ब्रँचने हातकड्या घातल्या आहेत. लाखो सबस्क्रायबर्सना सो कॉल्ड ओरिजिनल पॉर्न कंटेण्ट विकून ही टोळी कोट्यवधी रुपये कमवत होती. सबस्क्रिप्शन बेसिसवर दर आठवड्याला LIVE पॉर्न मूव्हीज देणाऱ्या या ऑनलाइन टोळीचा कारभार पोलिसांच्या नजरेत आला आणि त्यांनी सापळा रचून त्यांना अटक केली. या ऑनलाइन पॉर्न विकणाऱ्यांची कार्यशैली पाहून धक्का बसेल. मोबाईल ॲपच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवल्या जायच्या. त्यासाठी लोक यांना सबस्क्रिप्शनचे पैसेही द्यायचे. एबीपीने दिलेल्या बातमीनुसार मुंबई क्राइम ब्रँचने यासंदर्भात सात जणांना अटक केली आहे. त्यामध्ये अशा फिल्म्समध्ये काम करणाऱ्या अभिनेत्याचाही समावेश आहे. अशा पॉर्न कंटेण्टमधून हे लोक कोट्यवधी रुपये कमवत असल्याचा पोलिसांचा संशय आहे. मुंबई क्राइम ब्रँचने आतापर्यंत केलेल्या तपासात त्यांना अशा 12 मोबाइल ॲप्सची माहिती मिळाली आहे, ...पान २ वर...

## मंत्रालयात पुन्हा खळबळ, एकाच विभागात 8 कर्मचारी आढळले कोरोना पॉझिटिव्ह



मुंबई,राज्यामध्ये पुन्हा एकदा कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अशातच राज्यातील मुख्यालय समजल्या जाणाऱ्या मंत्रालयात महसूल विभागात 8 कर्मचाऱ्यांना कोरोनाची बाधा झाल्याचं समोर आलं आहे. तसंच महसूल विभागातच आणखी आठ ते नऊ लोकांना ताप, थंडी, खोकला अशी कोरोनाची लक्षणे आढळल्याची देखील माहिती समोर येत आहे.

प्रशासकीय आणि महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या मंत्रालयातच कर्मचाऱ्यांना कोरोनाची बाधा झाल्याने एकच खळबळ माजली असून पुढील काही दिवसात मंत्रालयात पुन्हा एकदा सर्वसाधारण प्रवेशाला देखील मर्यादा आणण्याचा विचार सुरू असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.



# दारु पिऊन शिवीगाळ करणाऱ्या भावाची हत्या



दारू पिऊन शिवीगाळ करणाऱ्याची त्याच्या लहान भावाने काठीने वार करून हत्या केली. ही घटना काटोलपासून १० किमी अंतरावरील इसापूर खुर्द येथे घडली. रोशन नागोराव ठाकरे (वय २५), असे मृताचे नाव आहे.

दारू पिऊन शिवीगाळ करणाऱ्याची त्याच्या लहान भावाने काठीने वार करून हत्या केली. ही घटना काटोलपासून १० किमी अंतरावरील इसापूर खुर्द येथे घडली. रोशन नागोराव ठाकरे (वय २५), असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी काटोल पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून नितेश नागोराव ठाकरे (वय २३) याला अटक केली आहे.

१६ फेब्रुवारीला रात्री ८ वाजताच्या सुमारास नितेश हा जेवण करीत होता.

त्यावेळी दारू पिऊन आलेल्या रोशन याने लहान भाऊ नितेशला शिवीगाळ केली. यामुळे संतप्त झालेल्या नितेशने त्याला काठीने मारहाण केली यात रोशन याचा मृत्यू झाला. काटोल पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासादरम्यान नितेश याने मारहाण केल्याने रोशनचा मृत्यू झाल्याचे समोर आले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून नितेश याला अटक केली.

# जावेसोबत सोसायटीसमोरच्या रस्त्यावर शतपावली करत होती, इतक्यात...



पुणे: पुण्यातील चंदननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडगावशेरीत सोसायटीबाहेरच्या रस्त्यावर शतपावली करण्यासाठी गेलेल्या महिलेचे दागिने हिसकावून चोरटे पसार झाले. या प्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात दोन अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला.

पुण्यातील वडगावशेरी येथील बॉम्बे सॅपर्स कॉलनीजवळ सनराइज सोसायटीसमोरील रस्त्यावर गुरुवारी रात्री नऊ ते साडेनऊ दरम्यान महिला आपल्या जावेसोबत सोसायटीच्या रस्त्यासमोर रस्त्यावर शतपावली करत होते. त्याचवेळी दोन अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून वेगाने तिथे आले. त्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळवून नेले.

या घटनेनंतर महिलेने आरडाओरडा केला.

त्यानंतर चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. चोरीला गेलेले मंगळसूत्र ४८ हजार रुपये किंमतीचे होते. पोलीस आरोपींचा शोध घेत असून, अधिक तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# लहानग्याचे अपहरण-हत्या; आरोपीला जन्मठेप

## सात वर्षांच्या मुलाचे अपहरण करुन नंतर त्याची अत्यंत क्रूरपणे हत्या करणाऱ्या संतोष शर्मा याला शनिवारी ठाणे न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.



ठाणे: सात वर्षांच्या मुलाचे अपहरण करून नंतर त्याची अत्यंत क्रूरपणे हत्या करणाऱ्या संतोष शर्मा याला शनिवारी ठाणे न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. गळा आवळून तसेच डोक्यात दगड घालून मुलाची हत्या केल्यानंतर आरोपीने मृतदेह खोलीत खड्ड्यामध्ये पुरला होता. सन २०१६च्या नोव्हेंबरममध्ये मुंब्रा येथे घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली होती.

आईवडिलांसह हा मुलगा मुंब्रा परिसरात राहत होता. ११ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी तो अचानक गायब झाला. पालकांनी शोध घेऊनही तो सापडला नाही. दुसऱ्या दिवशी आईच्या तक्रारीनंतर मुंब्रा पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी मुलाचा शोध घेण्यास सुरुवात केली. परंतु मुलगा काही सापडेना. अखेर आठवड्यानंतर रंगकाम करणाऱ्या संतोष शर्मा याला पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्याकडे चौकशी केला असता, त्यानेच या मुलाची हत्या केल्याची बाब समोर आली. आरोपी संतोष शर्मा आणि हा मुलगा शेजारी राहत होते. ११ नोव्हेंबरच्या दुपारी १ वाजता सात वर्षांचा हा मुलगा येथील एका व्यक्तीच्या घरी टीव्ही पाहत बसला असताना, चणे खायला देतो असे सांगून संतोषने या मुलाचे अपहरण केले.

त्यानंतर तो मुलाला पक्के बांधकाम केलेल्या बैठ्या खोलीमध्ये घेऊन गेला. तेथे नायलॉनच्या दोरीने मुलाचा गळा आवळला, तसेच डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. नंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने त्याच खोलीत खड्डा खोदून मुलाचा मृतदेह त्यामध्ये पुरला होता. मुंब्रा पोलिस ठाण्यातील पोलिस निरीक्षक (गुन्हे) मनोहर पाटील यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करत आरोपीविरुद्ध ठाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. शनिवारी या खटल्याचा निकाल लागला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. आर. वैष्णव यांनी संतोषला जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तर अन्य कलमांखाली प्रत्येकी तीन वर्षे आणि एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनाववली आहे.

पोलिस संतोषला घटनास्थळी घेऊन गेले असता, पोलिसांच्या हाताला झटका देऊन त्याने पळ काढला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलिसांनी पुन्हा त्याला पकडले होते. त्यानंतर मुलाचा पुरलेला मृतदेह खड्ड्यातून बाहेर काढण्यात आला होता.

# रवी पुजारी अखेर मुंबई पोलिसांच्या कचाट्यात; 'त्या' 49 गुन्ह्यांची उकल होणार

**गँगस्टर रवी पुजारी अखेर मुंबई पोलिसांच्या तावडीत येणार आहे. कर्नाटक पोलीस पुजारीला मुंबई पोलिसांच्या हवाली करणार असून पुजारीच्या चौकशीत अनेक गंभीर गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता आहे.**



मुंबई: दोन वर्षांपूर्वी दक्षिण आफिकेतून प्रत्यार्पण करून भारतात आणलेल्या गँगस्टर रवी पुजारीचा ताबा मिळविण्यात अखेर

मुंबई पोलिसांना यश आले आहे. बंगळुरू येथील न्यायालयाने कोठडी मंजूर केल्यामुळे गुन्हे शाखेचे पथक कर्नाटक पोलिसांकडून ताबा घेऊन त्याला सोमवारी मुंबईत आणणार आहेत. रवी पुजारी याच्यावर मुंबईत सुमारे ४९ गुन्हे दाखल असून अनेक बड्या आणि प्रसिद्ध व्यक्तींना त्याने खंडणीसाठी धमकावले आहे. त्याचा ताबा मिळाल्याने अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

मुंबई प्रमाणे देशभरात रवी पुजारी याच्यावर गुन्हे दाखल आहेत. परदेशात बसून रवी पुजारी आपल्या हस्तकांमार्फत भारतामध्ये टोळी चालवत होता. रवी पुजारी हा दक्षिण आफिका येथील सेनेगल पोलिसांच्या ताब्यात असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याचे प्रत्यार्पण करण्यासाठी केंद्रीय यंत्रणांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. दोन वर्षांपूर्वी त्याला भारतामध्ये आणण्यात आले. सुमारे ९० पेक्षा अधिक गुन्हे कर्नाटकमध्ये दाखल असल्याने भारतात आणल्यानंतर त्याचा ताबा प्रथम कर्नाटक पोलिसांना देण्यात आला.

रवी पुजारी याच्याविरोधात मुंबईत सुमारे ४९ गुन्हे दाखल असून त्यापैकी २६ गुन्ह्यांमध्ये 'मोक्का' लावण्यात आला आहे. २०१६ मध्ये विलेपार्लेच्या गजाली हॉटेलबाहेर खंडणीसाठी गोळीबार करण्यात आला होता. याप्रकरणी खंडणी विरोधी पथकाने ७ जणांना अटक करून आरोपपत्र दाखल केले.

या तसेच इतर गुन्ह्यांमध्ये पुजारील अटक करण्याकरिता गुन्हे शाखेचे सहपोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे प्रभारी पोलीस निरीक्षक सचिन कदम आणि अजय सावंत यांनी मुंबई पोलिसांच्या वतीने प्रत्यार्पण प्रस्ताव सादर करून सर्व त्या कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या. आता न्यायालयाची परवानगी मिळाल्याने सोमवारीच पुजारीला मुंबईत आणले जाणार हे स्पष्ट झाले आहे.

रवी पुजारी हा मूळचा कर्नाटकच्या उडपी जिल्ह्यातील मालपे येथील असून १९९० मध्ये त्याने गँगस्टर छोटा राजन टोळीसाठी काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने स्वत:ची गुन्हेगारी टोळी बनवली.

पुजारी याने मुंबई, बंगळुरू आणि मँगलोर येथे वेगवेगळया क्षेत्रातील व्यावसायिक, बॉलिवूडमधील प्रसिद्ध व्यक्तींना खंडणीसाठी धमकावण्यास व हस्तकांमार्फत त्यांच्यावर जीवघेणे हल्ले करण्यास सुरुवात करून आपल्या टोळीची दहशत निर्माण केली.

प्रसिद्ध दिग्दर्शक महेश भट आणि अली मोरानी यांच्या हत्येचा कट रचल्याचाही पुजारीवर आरोप आहे.

# मालक नसताना कपडे चोरणाऱ्यास अटक



रविवार पेठेतील एका कपड्याच्या दुकानाचे गोडावून बनावट चावीने उघडून साठ हजार रूपयांचे कपडे कामगाराने चोरून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. हा प्रकार मालकाच्या लक्षात आल्यानंतर पाळत ठेवून त्यांनी कामगाराला कपडे चोरताना रंगेहात पकडले. कपडे चोरण्यासाठी त्याने गोडावूनची बनावट चावी बनविल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल कामगाराला अटक करण्यात आली आहे.

महंमद शाहीद बबलू सिद्धीकी (वय २२, रा. सोमवार पेठ, मूळ-उत्तर प्रदेश) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत मंजूर आलम (वय ५९, रा. कोंढवा) यांनी तक्रार दिली आहे. काझी कॉम्प्लेक्स येथे आठ ते १८ फेब्रुवारी दरम्यान ही घटना घडली. पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, आलम यांचे रविवार पेठेत दुकान असून दुकानाच्या पाठीमागे काझी कॉम्प्लेक्स येथे कपडे ठेवण्यासाठी गोडावून आहे. आलम यांच्या दुकानात सिद्धीकी हा कामगार म्हणून काम करतो. आलम हे सिद्धीकीला कधी-कधी गोडावून उघडून कापडे आणण्यासाठी चावी देत होते. या दरम्यान त्याने त्या गोडावूनची बनावट चावी तयार करून घेतली. मालक नसताना आणि रात्री गोडावून उघडून तो कपडे चोरून

# धक्कादायक! डांबून ठेवून अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

कासगंज: उत्तर प्रदेशातील कासगंजमध्ये एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तीन तरुणांनी तिचे अपहरण केल्यानंतर डांबून ठेवले. तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिला गावाजवळ सोडून आरोपी पसार झाले.

आरोपी पीडितेला फूस लावून घेऊन गेले. त्यानंतर एका खोलीत तिला डांबून ठेवले. तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.

पीडित मुलीने पोलिसांना सांगितले की, तीन जणांनी डांबून ठेवून सामूहिक बलात्कार केला. त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार, स्थानिक




या घटनेनंतर तीन दिवसांनी स्थानिक पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मुलीची जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या घटनेचा तपास पोलीस करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सुन्नगढी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात ही धक्कादायक घटना घडली. ११ फेब्रुवारी रोजी दुपारी तिघे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तिन्ही आरोपींच्या अटकेसाठी शोधमोहीम सुरू केली. पीडितेच्या तक्रारीनुसार, दोघांनी मुलीला फूस लावून एका खोलीत नेले. तिथे डांबून ठेवले. तिथे तिघांनीही सामूहिक बलात्कार केला. तीन दिवसांनी तिला गावाजवळ सोडून ते फरार झाले.

# पृष्ठ १ वरुन

## महाराष्ट्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव,

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं होतं. त्याला प्रतिसाद देत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मार्च 1 पर्यंत राज्यातील सार्वजनिक कार्यक्रम रद्द केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे दररोज वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा कार्यक्रमात सहभागी होत असतात. पवार यांच्यासोबत अनेक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने गर्दी करतात. सध्या रुग्णांची संख्या वाढत असल्याने सार्वजनिक कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय शरद पवार यांनी घेतला आहे. राज्यात गेल्या तीन दिवसांत चार कॅबिनेट मंत्र्यांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यात विशेष म्हणजे सर्वाधिक राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुतेक मंत्री आहेत. जलसंपदामंत्री एनसीपी अध्यक्ष जयंत पाटील, अन्नधान्य पुरवठा मंत्री छगन भुजबळ, अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे, राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना कोरोनाची लागण झाली आहे. हे सर्व मंत्री विलगीकरणात असून या सर्व मंत्र्यांच्या संपर्कात आलेल्या लोकांनी खबरदारी घेण्याचं आवाहन केलं जात आहे. (वाचा - महाराष्ट्रात कोरोनाचा नवा स्ट्रेन; Covid-19 अधिक संसर्गजन्य आणि धोकादायक)

राज्यात मागील आठवड्यामध्ये रुग्णांची संख्या साधारण दोन हजाराच्या आसपास होती. पण रविवारी एका दिवसात जवळपास सात हजार रुग्ण नव्याने आढळले आहेत. राज्यात ठाणे, मुंबई, पुणे, अमरावती या शहरांमध्ये दिवसेंदिवस रुग्णांची संख्या अधिक आढळत असून ॲक्टिव रुग्ण देखील या शहरांमध्ये सर्वाधिक आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी त्यांचे सार्वजनिक, राजकीय कार्यक्रम 1 मार्चपर्यंत रद्द केले. त्यांच्याप्रमाणे इतर मंत्री असा निर्णय घेण्याची शक्यता देखील आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने दोन आठवडे जनता दरबार देखील बंद करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबईतील मुख्यालयामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांचे जनता दरबार होतात, त्याला मोठ्या प्रमाणात गर्दी होते, या गर्दीमुळेदेखील सर्वाधिक धोका संभवत असल्याने राष्ट्रवादी पक्षाच्यावतीने यापूर्वीच खबरदारी घेण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे.

## विनामास्क फिरले अन्

तीव्र केली आहे. शनिवारी रेस्टॉरंट, मंगल कार्यालये क्लब, जिमखाना, चित्रपटगृहांत कारवाई करत, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. एकूण १६ हजार १५४ विनामास्क नागरिकांकडून प्रत्येकी २०० रुपये, याप्रमाणे ३२ लाख ३० हजार ८०० इतकी दंड वसुली करण्यात आली.कारवाईदरम्यान पालिकेच्या २४ विभागांपैकी ‘के/पश्चिम’ विभागात सर्वाधिक म्हणजे २ हजार ३४५ व्यक्तिंवर दंडात्मक कारवाई करून ४ लाख ६९ हजारांचा दंड वसूल केला. ‘के/पश्चिम’ विभागात प्रामुख्याने अंधेरी (पश्चिम) परिसराचा समावेश होतो. या खालोखाल ‘एच/पश्चिम’ विभागात १ हजार १५९ जणांकडून २ लाख ३१ हजार ८०० इतका दंड वसूल केला. ‘एच/पश्चिम’ विभागामध्ये प्रामुख्याने वांद्रे परिसराचा समावेश होतो.दक्षिण मुंबईतील ‘ए’ विभागात १ हजार ३० जणांवर कारवाई करून २ लाख ६ हजारांचा दंड वसूल केला. ‘ए’ विभागामध्ये प्रामुख्याने कुलाबा, फोर्ट इत्यादी परिसर येता. या खालोखाल एल विभागात ८८६ जणांवर कारवाई करून, १ लाख ७७ हजार २०० एवढा दंड वसूल केला. एल विभागात प्रामुख्याने कुर्ला परिसराचा समावेश होतो.या खालोखाल एफ/उत्तर विभागामध्ये ७४४ व्यक्तींकडून रुपये १ लाख ४८ हजार ८००, ‘एस’ विभागात ७४३ व्यक्तींकडून १ लाख ४८ हजार ६००, ‘जी/उत्तर’ विभागात ७०९ जणांकडून १ लाख ४१ हजार ८००, ‘के/पूर्व’ विभागात ७०७ व्यक्तींकडून १ लाख ४१ हजार ४००, ‘आर/मध्य’ विभागात ७०५ व्यक्तींकडून १ लाख ४१ हजार, ‘पी/उत्तर’ विभागात ७०३ व्यक्तींकडून १ लाख ४० हजार ६००, ‘एच/पूर्व’ विभागात ६३५ व्यक्तींकडून १ लाख २७ हजार, ‘जी/दक्षिण’ विभागात ६३१ व्यक्तींकडून १ लाख २६ हजार २००, ‘आर/उत्तर’ विभागात ६१६ जणांकडून १ लाख २३ हजार २००, ‘एफ/दक्षिण’ विभागात ६०२ जणांकडून १ लाख २० हजार ४००, ‘पी/दक्षिण’ विभागात ६०० व्यक्तींकडून १ लाख २० हजार, ‘एम/पश्चिम’ विभागात ५९७ व्यक्तींकडून १ लाख १९ हजार ४००, ‘एन’ विभागात ५८७ व्यक्तींकडून १ लाख १७ हजार ४००, ‘आर/दक्षिण’ विभागात ५७२ व्यक्तींकडून १ लाख १४ हजार ४००; तर ‘डी’ विभागात ५२१ व्यक्तींकडून १ लाख ४ हजार २०० एवढा दंड वसूल करण्यात आला.नियमांचे पालन गरजेचे!‘टी’ विभागातून ३५२ व्यक्तींकडून ७० हजार ४००, ‘सी’ विभाग परिसरातून २३७ व्यक्तींकडून ४७ हजार ४००, ‘बी’ विभाग परिसरातून २१३ व्यक्तींकडून ४२ हजार ६००, ‘एम/पूर्व’ विभागातून १७८ व्यक्तींकडून ३५ हजार ६००, तर ‘ई’ विभागातून ८२ व्यक्तींकडून १६ हजार ४०० रुपये एवढा दंड मास्क न घातल्याने वसूल करण्यात आला. नियमांचे पालन करण्याचे आवाहनही पालिकेने केले.

## मुंबईचा नियोजनबद्ध विकास!

जोडण्यासाठी वरळी-शिवडी उन्नत मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. हा उन्नत मार्ग तीन वर्षांत म्हणजे २०२३ मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. वरळी-शिवडी उन्नत मार्ग वैशिष्ट्ये पूर्व द्रुतगती मार्ग, शिवडी येथे हार्बर रेल्वे मार्ग, आंबेडकर रोड मोनो रेल्वे स्थानक, आंबेडकर रोडवरील उड्डाणपूल, परळ येथे मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्ग, सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपुलावरून जाईल. या ठिकाणी सुमारे ४० ते ८५ मीटर लांबीच्या मोठ्या गाळयांसाठी (स्पॅन) स्टील स्ट्रक्चरचा वापर होईल. प्रभादेवी आणि परळ रेल्वे स्थानकाजवळील सध्याचा १०० वर्षे जुना उड्डाणपूल पाडून त्या जागी द्विस्तरीय रचना असलेला उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे.

## सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी

मराठवाड्यात जाऊन आलो. जव्हारला भेट दिली. ‘हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग’ १ मेपासून नागपूर-शिर्डी वाहतुकीस सुरु करीत आहोत. कामे थांबणार नाहीत, मात्र आता गर्दी करून कोणतेही कार्यक्रम होणार नाहीत, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

घरातूनच कामावर भर द्या!

उपनगरी रेल्वे गाड्या, बेस्ट बस आणि अन्य सार्वजनिक वाहतूक साधने, कार्यालये, हॉटेल्स यामधील गर्दी कमी करण्यासाठी कार्यालयीन वेळा बदलाव्यात आणि शक्यतो घरून काम करण्याची मुभा कर्मचाऱ्यांना द्यावी. कार्यालयात कमीतकमी कर्मचारी संख्या ठेवावी. त्यासाठी सर्वांना एकाच वेळी न बोलावता त्यांचे गट करून आलटून-पालटून बोलवावे, असे आवाहन मुख्यमंत्री ठाकरे यांनी खासगी आस्थापना, उद्योगांना केले.

देशात १४,२६४ नवे रुग्ण

## त्रीसुत्री पाळा व लॉकडाऊन

पत्रात म्हटले आहे.कोरोना विषाणु मागील वर्षभरापासून आरोग्यमंत्री राजेश टोपेंचा पाठलाग करत होता. राजेश टोपेंनी कोरोनाला जवळही फिरकू दिले नाही. परंतु काही दिवसांपूर्वी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना कोरोनाची लागण झाली आहे. राजेश टोपे रुग्णालयात उपचार घेत आहे. राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी पत्र जारी करत म्हटले आहे की, गेल्या वर्षभरापासून आपण कोरोना विरुध्दची लढाई लढत आहोत. शासनाची खंबीर भूमिका, ठोस उपाययोजना व प्रामाणिक प्रयत्न, जीवाची पर्वा न करता लढणारे अनेक कोरोना योध्ये, विशेषतः डॉक्टर,नर्सेस,आरोग्यसेवक, पोलीस,स्वच्छता कामगार यांच्यामुळे आपण कोरोना नियंत्रित करु शकलो. मात्र अद्यापही कारोना गेलेला नाही.

## वाढत्या पेट्रोल, डिझेलचा

टॅक्सीचे भाडे 22 रुपयांवरून 25 रुपये झाले आहे. या भाडेवाढीचे स्वागत मुंबईसह ठाणे आणि नवी मुंबईच्या रिक्षा आणि टॅक्सी संघटनांनी केले आहे. गेल्या पाच वर्षांपासून इंधनाचे दर वाढत होते. त्याशिवाय वाहनाचा मेन्टेनन्स आणि विमादेखील वाढला होता. तरीही भाड्यामध्ये एक पैशाची वाढ झाली नव्हती. आता पेट्रोल, डिझेलसह सीएनजीदेखील महाग झाला आहे. यामुळे काहीतरी फायदा होऊन दिलासा मिळेल असे त्यांचे म्हणणे आहे. पेट्रोल, डिझेलचे दर वाढतायत; अशी घाला वाहनाच्या घटत्या मायलेजला लगाम...अनेक चालकांनी त्यांच्या वाढलेल्या भाड्यावर आनंद व्यक्त केला आहे. कारण कोरोनामुळे एप्रिल ते जूनमध्ये एकाही रुपयाचे उत्पन्न मिळाले नव्हते.

## धक्कादायक! OTT वर LIVE

ज्या अश्लील व्हिडीओ आणि फिल्म्स दाखवतात. दरमहा 199 रुपये सबस्क्रिप्शन घेऊन ते आपलं चॅनेल चालवतात. रीतसर कॅमेर क्रू, अभिनेते, तंत्रज्ञ घेऊन या फिल्म्सचं शूटिंग सुरू असतं. या शूटिंगच्या जागीच पोलिसांनी छापा टाकून 7 जणांना अटक केली आहे.

अटक केलेल्या आरोपींच्या मते, ते porn तयार करत नसून एका बोल्ड लव्ह स्टोरीचं चित्रिकरण करत होते. पण पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांना या ठिकाणी स्क्रिप्ट, डायलॉगही सापडले आणि लव्ह स्टोरीपेक्षा हा भलताच कंटेण्ट असल्याचं उघड झालं.

## संपादकीय...

# आजार आणि औषध



अन्य कोणा येरागबाळ्याने ही विधाने केली असती तर ती हास्यास्पद ठरून दुर्लक्षयोग्य मानणे शहाणपणाचे ठरले असते. तथापि ही विधाने करणारी व्यक्ती आपल्या देशातील सर्वोच्च अधिकारी असल्याने या विधानांतील इतिहास आणि मांडले गेलेले वास्तव यांची तपासणी आवश्यक ठरते. ''आधीच्या सरकारांनी इंधनास आयात पर्याय शोधले असते तर आज आपल्या देशातील मध्यमवर्गावर दरवाढीचा भार पडला नसता'' हे आणि ''आपल्यासारखा वैविध्यपूर्ण आणि बुद्धिमान देश ऊर्जेसाठी इतका आयातावलंबी कसा राहू शकतो'' ही ती दोन विधाने. आपल्या देशात इंधनाच्या, त्यातही पेट्रोलच्या दराने, शंभरी गाठली ही पार्श्वभूमी या विधानांना होती. या संदर्भात सरकारवर निष्क्रियतेचा आरोप केला जात असताना राजकीय प्रत्युत्तरादाखल ही विधाने केली गेली. त्यातील राजकारणाविषयी भाष्य करण्याची गरज नाही. ते आता आपल्या देशातील शेंबडय़ा पोरासही कळू लागले आहे. तेव्हा यात तपासायाचे ते ऐतिहासिक वास्तव. ते असे की स्वातंत्र्य मिळाल्या मिळाल्या, म्हणजे अगदी १९४७ सालीच, तत्कालीन सरकारला देशासमोरील गंभीर इंधन वास्तवाची जाणीव होती. त्यामुळे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी या क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी केशवदेव मालवीय या नेक व्यक्तीकडे दिली. ते त्या वेळी पायास भिंगरी लावल्यागत देशभर हिंडले. हेतू हा की तरुण अभियंत्यांनी वा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तेल उत्खननाच्या क्षेत्राकडे वळावे. त्यांच्या या प्रयत्नास यश येऊन अनेक तरुण या सरकारी कामास रुजू झाले. त्यापैकी अनेकांनी तेल उत्खननात प्राणही गमावले. कारण हे तंत्रज्ञान त्या वेळी आपल्यास अवगत नव्हते आणि अमेरिका ते देण्यास तयार नव्हती. या अशा प्रयत्नांतून पहिल्यांदा गुजरातमधील अंकलेश्वर येथे तेल आढळले. त्यानंतर या मालवीय यांनी 'बॉम्बे हाय' नावाने ओळखल्या जाणाऱ्या समुद्री परिसरातून तेल उत्खननावर लक्ष केंद्रित केले. यातही कमालीच्या अडचणींना भारतास सामोरे जावे लागले. एकही परदेशी तेल कंपनी यासाठी आवश्यक तेलविहीर यंत्रणा (ऑइल रिग) भारतास देण्यास तयार नव्हती. तेव्हा या मालवीय यांनी 'मित्सुबिशी' या बलाढय़ जपानी अभियांत्रिकी कंपनीशी संधान साधून, जुन्या उपकरणांच्या साह्याने तेलविहीर विकसित केली. या प्रयत्नांस विरोध करणाऱ्या वा त्याबाबत शंका घेणाऱ्यास मालवीय प्रत्यक्ष जाऊन भेटत आणि तेल शोधण्याच्या महत्त्वाच्या कार्यात जास्तीत जास्त जण कसे सहभागी होतील यासाठी प्रयत्न करीत. वास्तविक 'दीडशे वर्षांच्या इंग्रज राजवटीने तेल उत्खननाकडे दुर्लक्ष केल्याने आपली दुरवस्था आहे', असे सांगण्याची पळवाट त्यांना आणि पंतप्रधान नेहरू यांनाही होती. पण त्यांनी एकदाही असे केल्याची नोंद नाही. ही अशी चिरकी आणि भ्रामक तक्रार करण्यापेक्षा आपण स्वत: काय करू शकतो हे करून दाखवण्याकडे उभयतांचा कल होता.

हा इतिहास समजून घ्यायचा कारण 'आधीच्या सरकारांनी आयात पर्याय शोधला नाही' या विधानाची सत्यासत्यता लक्षात यावी म्हणून. त्यानंतर आसाम, राजस्थान अशी राज्ये, कृष्णा गोदावरी खोरे अशा अनेक ठिकाणी खनिज तेल वा नैसर्गिक वायू उत्खननाचे प्रयत्न झाले. त्यास आलेले यश मर्यादितच होते आणि त्या सत्ताधीशांच्या जागी अन्य कोणीही असता तरीही ते तसेच असले असते. एखाद्याच्या शेतातील विहिरीस पाणी लागते की नाही हे त्या शेताची मालकी कोणाकडे आहे यावर अवलंबून नसते हे जसे त्रिवार सत्य तसेच देशातील भूगर्भात तेल आहे की नाही याचा संबंध सत्तेवर कोण आहे याच्याशी नसतो, निदान तो तसा लावू नये, हेदेखील त्रिवार सत्य. आपल्या देशात ज्याप्रमाणे खनिज तेल नाही त्याप्रमाणे मुबलक प्रमाणावर सोने वा युरेनियमदेखील नाही. या सर्व गोष्टी आपण आयात करतो. त्यास पर्याय नाही. तेव्हा तेल आयातीस पर्याय का शोधला नाही असे विचारताना हा प्रश्न सोने वा युरेनियम यांच्या आयातीबाबतही विचारता येईल. अमेरिकेशी मैत्री करून युरेनियम मिळेल यासाठी प्रयत्न करणाऱ्यांत विद्यमान सत्ताधीशही आहेतच. तेव्हा याबाबत हा प्रश्न विचारणे आपले विरोधाभास दर्शन घडवणारे ठरते.

आणि दुसरे असे की तेल आयात करावे लागते म्हणून 'मध्यमवर्गावर' त्याचा भार पडतो हे तर्कट अगम्यच म्हणायचे. तसे असेल तर साधारण २०१८ पर्यंत तेलासाठी जवळपास पूर्णपणे आयातीवरच अवलंबून असलेल्या अमेरिकेत इंधनाची भाववाढ का नव्हती? ती नव्हती याचे कारण तेथील सरकारचे पोट इंधनावर लावले जाणारे कर व/वा अधिभार यावर अवलंबून नव्हते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर वाढले की अमेरिकेत इंधनाचे दर वाढतात आणि कमी झाले की त्याचा फायदा तेथील नागरिकांना स्वस्त दरांत तेल मिळण्यात होतो. जगात एकूण उपसल्या जाणाऱ्या तेलापैकी २६ टक्के एकटय़ा अमेरिकेस लागत होते. तरीही त्या देशात एकही सरकारी मालकीची तेल कंपनी नाही. आपल्याकडे त्या किती आहेत आणि त्याचे आपण काय भजे केले याचीही चर्चा यानिमित्ताने व्हायला हवी. चढय़ा इंधन दरांचा फायदा सरकारला मिळावा म्हणून या कंपन्यांनी केंद्रास जास्तीत जास्त लाभांश द्यावा यासाठी कोणत्या सरकारांनी किती मुंडय़ा पिरगाळल्या हेदेखील समोर यायला हवे.

# भाषा पुरे; कृती हवी...

## रुग्णालयांची करोनावरील लस टोचण्याची क्षमता आणि ती किती जणांना द्यायची याचे सरकारी नियंत्रण अत्यंत व्यस्त आहे- आणि तेही बाजारात लशींचा भरपूर साठा उपलब्ध असताना...

उक्ती आणि कृती यांतील थेट संबंध सरकारविषयी विश्वास वा अविश्वास निर्माण करतो. या गृहीतकावर विद्यमान केंद्र सरकारची भाषा आणि त्यानंतरची कृती तपासणे आवश्यक ठरते. विशेषत: खासगी उद्योगांविषयी सरकारला अचानक आलेला उमाळा, सरकारी 'बाबूं'बाबत तितकेच अचानक पडलेले प्रश्न हे काही याबाबतचे ताजे दाखले. पण त्यानंतर सरकारची कृती तशी आहे का, हा या संदर्भातील प्रश्न. तो पडतो याचे कारण या संदर्भातील इतिहास. उदाहरणार्थ, दावोस येथे जागतिक आर्थिक मंचावर मुक्त व्यापाराची भाषा झाल्यानंतर देशी उद्योजकांसाठी आयातशुल्क वाढवण्याचा निर्णय वा 'व्होडाफोन' आणि 'केर्न एनर्जी'संदर्भातील कृती हे सर्व परस्परविरोधी होते. आता आत्मनिर्भरतेसाठी सरकारने खासगी क्षेत्रास उत्तेजन द्यायला हवे हे या संदर्भातील सरकारचे नवे विधान. निती आयोगाच्या बैठकीत ते केले गेले. पण त्याच वेळी खासगी क्षेत्राचे स्वागत करण्यासाठी सर्वात मोठी संधी असताना तीबाबत मात्र सरकारची पावले उक्तीच्या बरोबर उलट पडताना दिसतात. खासगी क्षेत्रासाठी दरवाजे खुले करण्याची संधी सरकारला दिली आहे ती नव्याने पसरू लागलेल्या करोना विषाणूने. पण ती साधण्याची हिंमत सरकार दाखवणार काय, या प्रश्नाची चर्चा व्हायला हवी.

आपल्याकडे १६ जानेवारीस करोनाच्या लशीकरणास सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात एक कोटी प्रत्यक्ष आरोग्यसेवक, दुसऱ्या टप्प्यात करोनाविरोधी लढ्यातील दोन कोटी अन्य आणि त्यानंतर वयाने पन्नासहून अधिक, पण मधुमेहादी कारणांनी विषाणूबाधेचा धोका असलेले दोन कोटी ७० लाख नागरिक- असे टप्पे ठरवून दिले गेले. चोख म्हणता येईल अशी ही योजना. तीबाबत कोणाचेही दुमत असणार नाही. पण त्यानंतरची अंमलबजावणी तशी होऊ शकली काय? या प्रश्नाचे उत्तर नाइलाजाने नकारार्थी द्यावे लागेल. याचे कारण या सर्व काळात लशीकरण यंत्रणेवर ज्यांवर मोठ्या जोमाने टीका केली गेली त्या सरकारी 'बाबूं'चेच नियंत्रण राहिले. त्यामुळे त्यातून अत्यंत अवास्तव अशा अटी घातल्या गेल्या. उदाहरणार्थ, सर्व लशीकरण केंद्रांना पहिल्या टप्प्यात प्रतिदिन फक्त १०० लसकुप्या दिल्या गेल्या आणि दररोज सकाळी १० वाजता या लशी कोणास द्यायच्या याची यादी दिली गेली. त्याआधी संबंधित रुग्णालयांनी आपल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांची नावे संबंधित यंत्रणेस सादर करणे अपेक्षित होते. ते झाले. पण ज्यांनी ही लस टोचून घेणे अपेक्षित होते त्यांना 'आज आपला क्रमांक आहे' ही माहिती दिली गेलीच असे नाही. हे जाणूनबुजून झाले नाही. आव्हानाचा आकारच इतका की, असे काही गोंधळ होणे नैसर्गिक होते. ते लक्षात आल्यानंतर दैनंदिन लसकुप्यांची संख्या २५०वर नेली गेली. पण लस आणि अपेक्षित लक्ष्य यांचा ताळमेळ काही जमला नाही. त्यामुळे लसकुप्या हाती आल्यानंतर रुग्णालय कर्मचाऱ्यांचा बराच वेळ ती घेणाऱ्या संबंधितांची शोधाशोध करण्यात गेला. यात अद्यापही मोठी सुधारणा झालेली आहे असे नाही. रुग्णालयांची लस टोचण्याची क्षमता आणि ती किती जणांना द्यायची याचे सरकारी नियंत्रण अत्यंत व्यस्त आहे.आणि हे सर्व बाजारात लशींचा भरपूर साठा उपलब्ध असताना. पुण्यातील 'सीरम'सारख्या एका संस्थेत साधारण १० कोटी वा अधिक लशींचा साठा पडून आहे. परिस्थिती अशी की, या लशी साठवायची जागा कमी पडू लागली आहे. दर महिन्यास १० कोटी इतक्या गतीने आपण लसनिर्मिती करू शकतो असे याच कंपनीच्या वतीने सांगितले गेले आहे. खेरीज हैदराबादच्या 'भारत बायोटेक'चा लससाठा वेगळाच. याच्या जोडीला जगातील अन्य अनेक कंपन्या आपापली लस बाजारात पाठवण्यासाठी रांगेत आहेत. लशींबाबत 'देता किती घेशील दो कराने' अशी ही अवस्था. ती पाहता, या लशीकरण मोहिमेत अन्य अनेकांना सहभागी करून घेण्याखेरीज पर्याय नाही. याचे कारण लसनिर्मिती आणि ती प्रत्यक्ष टोचली जाणे यांतील अंतर इतके आहे की, सरकारचा लशीकरणाचा सध्याचा महिन्यास ८० लाख हा वेग आणि सर्व नागरिकांना प्रत्येकी दोन मात्रा ही गरज लक्षात घेतली तर लक्ष्यपूर्तीसाठी किमान एक तप, किंबहुना अधिकच काळ



लागेल. महिन्यास ८० लाख या गतीने दहा महिन्यांत आठ कोटी या हिशेबाने १३० कोटी जनतेस किती काळ, असे हे साधे समीकरण.

ते बदलायचे असेल तर सरकारने 'सर्व काही आमचे आम्ही' ही मानसिकता बदलायला हवी. याचा अर्थ, या लशीकरण मोहिमेत खासगी वैद्यक, रुग्णालये तसेच अगदी आरोग्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्था अशा सर्वांनाच सहभागी करून घ्यायला हवे. पण नेमके त्यासाठीच सरकार अजिबात तयार नाही. आणि याबाबत कारण काय? तर लशीकरण खासगी हातांत गेल्यास 'काही अयोग्य, चुकीची उत्पादने' बाजारात जाण्याचा धोका आहे, म्हणून. केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांनीच ही भावना अलीकडे व्यक्त केली. ती वाचून हसावे की आपल्या कर्मास रडावे असा प्रश्न पडण्याचा संभव अधिक. याचे कारण आपल्या हाताखालील सरकारी यंत्रणेवर डॉक्टरमहाशयांचा इतकाच जर विश्वास असेल तर त्यांनी मुळात लस संशोधनच खासगी हाती द्यायला नको होते. लशीचे संशोधन, तिच्या घाऊक निर्मितीपासून ती टोचण्यापर्यंत सर्व काही सरकारनेच करायला हवे. तसे झालेले नाही. यातील बहुतांश लशींचे संशोधन केले खासगी आणि परदेशी संस्था वा कंपन्या यांनी. त्यांची घाऊक निर्मिती करण्याचा अधिकार दिला ती कंपनीही खासगीच. पण ती टोचण्याचा अधिकार मात्र फक्त आणि फक्त सरकारी रुग्णालयांना, असा हा हास्यास्पद प्रकार. बरे, तो तरी पूर्ण जोमाने अमलात येत असता तरीही त्याचे स्वागत झाले असते. पण वास्तव तसे नाही. लशीकरणाच्या आतापर्यंतच्या दोन टप्प्यांत लक्ष्यपूर्ती झालेली नाही आणि तिसरा टप्पा कसा सुरू करावा याचा गोंधळ मिटलेला नाही. हे सर्व या लशीकरणाच्या जबाबदारीत अन्य अनेकांचा हातभार लागण्याची अपरिहार्यता दर्शवते. कारण हा प्रश्न फक्त इतक्या प्रचंड जनसंख्येच्या केवळ आरोग्याचा नाही, तर तो देशाच्या अर्थारोग्याचाही आहे. जोपर्यंत आपण किमान ७० टक्के जनतेचे लशीकरण करीत नाही तोपर्यंत समुदाय प्रतिकारशक्ती निर्माण होणार नाही. याचा अर्थ, आपल्यासमोर आव्हान आहे ते किमान ९१ कोटी जनतेचे लशीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्याचे. ही किमान संख्या आहे. या विषाणूचा नवा अवतार आल्यास वा अन्य काही गुंतागुंत समोर आल्यास यात वाढच होईल. ही संख्या कमी होण्याची शक्यता नाही.म्हणूनच सरकारने तातडीने आपल्या धोरणाचा फेरविचार करण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारने करोना-चाचण्यांचा वेग कसा वाढला याचे स्मरण करावे. जोपर्यंत या चाचण्या फक्त सरकारी हातात होत्या तोपर्यंतची त्यांची गती आणि नंतर खासगी वैद्यकसेवांना त्यात सहभागी करून घेतल्यानंतर त्यात कित्येक पटींनी झालेली वाढ यांतील फरकच वास्तव समजून सांगण्यास पुरेसा आहे. दुसरे असे की, ही लस खासगी क्षेत्रात उपलब्ध करून दिल्यास अनेक आस्थापने आपापल्या कर्मचाऱ्यांस ती देण्यास उत्सुक आहेत. यातील अनेकांना सरकारच्या सवलतीच्या दराचीही अपेक्षा नाही. तेव्हा खासगी क्षेत्राच्या भलामणीची केवळ भाषा नको. तशी कृतीही हवी.

# डॉक्टरांनी केला चमत्कार आणि पुन्हा धडधडू लागलं मृतांच्या शरीरातील हृदय



ब्रिटन, एखादी व्यक्ती मृत झाली की तिच्या शरीरातील हृदयाची (heart) धडधडही थांबते. पण आता डॉक्टरांनी असा चमत्कार केला आहे की त्यामुळे मृतांच्या शरीरातील हृदयही पुन्हा धडधडू लागलं. यामुळे तब्बल सहा जणांना नव्यानं जीवनदान मिळालेलं आहे. आरोग्य क्षेत्रातील ही मोठी क्रांती असल्याचं म्हटलं जातं आहे. हार्ट ट्रान्सप्लांट किंवा हृदय प्रत्यारोपण तसं काही नवं नाही. पण यासाठी ब्रेन डेड रुग्णांची गरज असते. म्हणजे जी व्यक्ती ब्रेनडेड होते, त्यांचा फक्त मेंदू मृत होतो पण शरीरातील इतर अवयव कार्य करत असतात. त्यामुळे एका विशिष्ट कालावधीत हे अवयव इतर गरजू व्यक्तींच्या शरीरात प्रत्यारोपित करता येतात आणि यासाठी अशा ब्रेनडेड रुग्णांच्या प्रतीक्षेत कित्येक गरजू आहेत. पण आता हार्ट ट्रान्सप्लांट करण्यासाठी ब्रेनडेड व्यक्तीच हव्या असं नाही तर कोणत्याही मृत व्यक्तीच्या शरीरातील हृदय प्रत्यारोपित करता येऊ शकतं, हे या डॉक्टरांनी दाखवून दिलं आहे. एनएचएसच्या ऑर्गन डोनेशन अँड ट्रान्सप्लान्टेशन विभागाचे संचालक डॉ. जॉन फोर्सिथ यांनी याबाबत माहिती देताना सांगितलं, हे तंत्रज्ञान फक्त ब्रिटनमध्येच नाही तर संपूर्ण जगात आरोग्य क्षेत्रात महत्त्वाचं ठरेल.ब्रिटनच्या नॅशनल हेल्थ सर्व्हिसमधील डॉक्टरांनी हा चमत्कार केला आहे. कॅंब्रिजशायरच्या रॉयल पेपवर्थ हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी एका मशीनमार्फत ही कमाल करून दाखवली. या मशीनला ऑर्गन केअर मशीन म्हटलं जातं. डॉक्टरांनी या मशीनच्या मदतीनं मृत व्यक्तीच्या शरीरातील हृदय पुन्हा जिवंत केलं आणि हृदय मग त्यांनी 6 लहान मुलांमध्ये प्रत्यारोपित केलं. 12 ते 16 व.योगटातील ही मुलं आहेत.

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार; आई रागावल्याने घरातून निघून गेली होती

## आई रागावल्याने नाराज होऊन घराबाहेर गेलेल्या मुलीला तिघांनी फूस लावून एका हॉटेलमध्ये नेले. तेथे तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. बिहारमधील पाटणा येथे ही धक्कादायक घटना घडली.

पाटणा: बिहारमधील पाटणा येथील एका अल्पवयीन मुलीवर हॉटेलमधील खोलीत सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पाटण्यातील दीघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. पीडितेने तक्रार केल्यानंतर महिला पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पोलीस या घटनेचा तपास करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलीची आई शनिवारी तिला रागावली होती. त्यामुळे नाराज होऊन ती घरातून निघून गेली होती. त्याच दरम्यान



तीन तरुणांनी मुलगी एकटी असल्याचा गैरफायदा घेऊन तिला सोबत येण्यास सांगितले. तिघांनी तिला फूस लावून दुचाकीवर बसवून नेले. एका हॉटेलात गेल्यानंतर तिथे तिच्यावर बलात्कार केला. पीडित मुलीने मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर हॉटेलमधील कर्मचारी सतर्क झाले. ते येईपर्यंत आरोपी तेथून पसार झाले. आरोपींची ओळख पटली असून, त्यात दोघे भाऊ असून, एक त्यांचा मित्र आहे. हे तिघेही एकाच परिसरात राहतात. पोलीस त्यांच्या अटकेसाठी ठिकठिकाणी छापेमारी करत आहेत. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. पीडितेचा जबाब लवकरच नोंदवून घेतला जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# आजीच निघाली अपहरणाची सूत्रधार

स्थानीक शारदानगर येथून बुधवारी अपहरण करण्यात आलेल्या नयन मुकेश लुणीया या चार वर्षीय बालकाची अहमदनगर येथून अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुटका केल्यानंतर त्यास शनिवारी अमरावतीत आणून त्याच्या कुटूंबीयांच्या स्वाधीन केले.

स्थानीक शारदानगर येथून बुधवारी अपहरण करण्यात आलेल्या नयन मुकेश लुणीया या चार वर्षीय बालकाची अहमदनगर येथून अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुटका केल्यानंतर त्यास शनिवारी अमरावतीत आणून त्याच्या कुटूंबीयांच्या स्वाधीन केले.

अपहरणाची मुख्य सूत्रधार नयनची आजी असल्याचे पोलिस आयुक्त डॉ. आरती सिंग यांनी पत्रपरिषद घेवून सांगितले. याप्रकरणात राजापेठ पोलिसांच्या पथकाने अहमदनगर पोलिसांच्या मदतीने बंबईया उर्फ उर्फ अल्मश ताहीर शेख (१८, रा. कोठला), मुसाहीब नासीर शेख (२१, रा. मुकुंद नगर), आसीफ युसूफ शेख (२४, कोठला), फिरोज रशीद शेख (२५, कोठला), हिना (वय २५) यांना अटक केली. शनिवारी याप्रकरणातील मुख्य सूत्रधार असणाऱ्या नयनच्या आजी मोनिका लुणीया(वय ४७ ) यांना पोलिसांनी अटक केली.नयनच्या आजीनेच अहमदनगर येथील २५ वर्षीय मैत्रिणीच्या मदतीने अपहरणाचा कट रचल्याचे पोलिस आयुक्तांनी पत्रपरिषदेत सांगितले. अहमदनगर येथून अटक करण्यात आलेली व अपहरण करणारी युवती ही नयनच्या घरी नेहमी ये-जा करीत होती. ती १५ ते २० दिवस



नयन याच्या घरी राहत होती. त्यामुळे तिची नयनसोबत चांगली ओळख झाली होती. नयनच्या आजीने खंडणीसाठी हा डाव रचला होता. गत दोन महिन्यांपासून यासाठी नियोजन आखण्यात आले होते. कोठला झोपडपट्टीत राहणारी आरोपी युवती व अन्य सहा जणांना यात सहभागी करण्यात आले होते. नयनच्या आजीची चौकशी करण्यात येत असून त्याद्वारे आणखी सत्य बाहेर येणार असल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले.

# चोरांनी लुटले अन् पुण्याशी नाळ कायमची तुटली!

नोकरी किंवा शिक्षणाच्या निमित्ताने राज्याच्या कानाकोपऱ्यातून तरुण पुण्यात येतात... स्थायिक होतात... त्यांची पुण्याशी नाळ जोडली जाते. अशाच प्रकारे एक अठरा वर्षांचा तरुण पुण्यात नोकरीसाठी आलेला. आजारी आईला भेटण्यासाठी तो गावी चालला असताना, खासगी बस स्टँडवर त्याला दोघांनी मारहाण करून लुटले. सुदैवाने काही मिनिटांतच पोलिसांनी चोरांना पकडून त्यांनी लुटलेली रोख रक्कमही पीडित तरुणाला परत मिळाली. मात्र, गावी गेल्यानंतर आजारी आईला घडलेला प्रकार सांगितला आणि नोकरीसाठी पुण्याला पुन्हा जायचे नाही, असे आईने बजावले.

सचिन बब्रुवान जाधव (वय १८, रा. दत्तनगर, कात्रज, मूळ रा. लातूर) या तरुणाबाबत हा प्रकार घडला आहे. त्याचे आई-वडील लातूरला राहतात. आई आजारी असल्याने तो तिला पाहण्यासाठी



शनिवारी गावी चालला होता. त्यासाठी पद्मावती येथील खासगी ट्रॅव्हल्स बसची आणि तिकिटाची चौकशी करण्यासाठी तो दुपारी चार वाजता गेला होता. तो बस आणि तिकिटाची चौकशी करत असल्याचे आरोपींनी पाहिले.

आरोपींनी त्याला लातूरच्या गाडीचे तिकीट काढून देतो, असे सांगितले. ते संतोषला पद्मावती येथील स्वामी विवेकानंद पुतळ्यासमोरील पार्किंगच्या जागेत घेऊन गेले. तेथे बसच्या आडोशाला नेऊन त्याच्याकडील पाकिट आणि मोबाइल जबरदस्ती काढून घेतला.

त्याने एटीएम कार्डचा 'पिन' सांगावा, यासाठी त्याला मारहाणदेखील केली. त्यानंतर त्यांनी पाकिटातील पाचशे रुपये घेऊन तिथून पळ काढला. सचिनने चोरांच्या हातातील मोबाइल हिसकावून घेतला.

## जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील निळेमोरे आदिवासी पाडयातील एका इसमास अर्जुनकुमार गिरी वय २५ वर्ष, मुळ राहायला बिहार हा दारु पिऊन विनाकारण शिव्या देत होता. त्यावेळी आदिवासी पाडयातील लोक त्यास विनाकारण लोकांना शिव्या का देतो असे समजावुन सांगत असताना जखमी व आरोपी यांच्यात वादावादी झाल्याने त्याचा मनात राग धरुन आरोपीने जखमीस गळयावर ब्लेडने वार करुन गळयास गंभीर दुखापत केली जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करुन पळुन गेला होता. त्याबाबत दिनांक १५/०२/२०२१, रोजी नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक.। ६९/२०२१ भादंवि कलम ३०७.५०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हा उघडकीस आणुन आरोपीला अटक करण्यासाठी नालासोपारा पोलीस ठाण्याचे यरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे यांनी स.पो.नि. किशोर माने व तीन पोलीस कर्मचारी यांचे पथक तयार केले. स.पो.नि.किशोर माने यांचे पथकाने आरोपी अर्जुनकुमार कपीलदेव गिरी वय २५ वर्षे, रा.आदिवासी पाडा निळेमोरे नालासोपारा प. मुळ रां. बिहार यास गुन्हा दाखल झाल्यापासुन १२ तासाचे आत दिनांक १५/०२/२०२१ रोजी अटक केलेली आहे.सदरची कामगिरी श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ०२, श्री सी.एम. जाधव, सहा. पोलीस आयुक्त, नालासोपारा, श्री. वसंत लब्दे , वरीष्ठ पोलीस निरीक्षक,नालासोपारा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक/किशोर माने, पोना/ अजित कांबळे, पोशि/सचिन मोहिते,प्रतिक पिंगळे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री किशोर माने, नालासोपारा पोलीस ठाणे करीत आहेत.

## वेश्या व्यवसायातुन 2 पिडीत महिलेची सुटका



दिनांक १३/०२/२०२१ रोजी अंतःपुरा लॉजींग एण्ड बोडींगमध्ये अवैध्य वेश्याव्यवसाय चालु असल्याची बातमी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली. बातमी मिळताच कक्षाच्या पथकाने अंतःपुरा लॉजींग एण्ड बोर्डीगच्या पार्किगंमध्ये छापा टाकुन दोन पिडीत महिलेची वेश्या व्यवसायातुन सुटका करुन दिली. वेश्यागमनास प्रवृत्त करणारे आरोपी नामे (१) आशिकसाहेब मोहम्मद इब्राहिम शेख, बय-२७ वर्षे,राहायला नालासोपारा (पुर्व).ता वसई, जि ठाणे, २) श्रीमती, वय-२५ वर्षे,रा- नालासोपारा यांना ताब्यात घेतले असुन आरोपींविरुध्द नयानगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६२/२०२१ भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७०, ३४ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त गुन्हे, श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-१ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री भास्कर पुकळे, पो हवा. पाटील, आसवले, डेमरे, निलंगे, महिला पो.हवा. धानवा व पथकाने केली आहे.

## अवैद्य दारु विक्री करणारा सराईत जेरबंद



वरिष्ठांकडून मिळालेल्या माहितीनुसार वाडा पोलीस ठाणे हद्दीत वाडामार्केट मधे, रोठे कॉम्पलेक्स इमारतीमधे, द्रोन हॉस्पीटलच्या खाली किराणा मालाच्या दुकानातमध्ये येथे इसम वय-३५ वर्षे, रा.ता.वाडा,जि.पालघर, याने त्यांच्या किराणा मालाच्या दुकानामध्ये काळया गुळाची पावडर, पीवळया काळसर गुळाचे तुकडे केलेला गुळ व नवसागर प्रोव्हीशन गुन्ह्याचा माल विनापरवानाबेकायदेशिर रित्या विक्रीसाठी बाळगला असतांना वाडा पोलीस ठाणे यांना मिळून आला. आरोपीत यांचे ताब्यातुन एकुण ३१,०४०/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यावरून सदर आरोपी यांचेविरुद्ध वाडा पोलीस ठाणे गुन्हा गु.रजि.क्र.४५/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम६५(फ) प्रमाणे, दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.सदरची कारवाई पोनि सुधिर संख्खे, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

## तरुणाचा संशयास्पद मृत्यू, भावानेच दिली पोलिसांना माहिती; चौकशीत धक्कादायक खुलासा




मिर्झापूर: उत्तर प्रदेशातील मिर्झापूरमध्ये भावानेच आपल्या भावाची हत्या केली आणि त्यानंतर भाऊ घरात मृतावस्थेत आढळून आल्याची माहिती स्वतःच पोलिसांना दिली. शवविच्छेदन अहवालात त्याची हत्या गळा आवळून केली गेल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी संशयावरून मृताच्या भावाला अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विसुंदरपुर गावात १८ फेब्रुवारी रोजी पोलिसांना या घटनेची माहिती मिळाली. मट्टर बिंद हा तरूण त्याच्या घरातील खोलीत मृतावस्थेत आढळून आल्याची माहिती मिळाली होती. या घटनेची माहिती देणारा मृताचा भाऊ होता. त्याच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. बिंद याचा मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला होता.

शवविच्छेदन अहवालात तरुणाची हत्या गळा आवळून करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी चौकशी करण्यास सुरुवात केली.

पोलिसांना त्याच्या भावावर संशय होता. कसून चौकशी केली असता, भावाने गुन्ह्याची कबुली दिली. दशरथ असे त्याचे नाव आहे.

अपर पोलीस अधीक्षक संजय वर्मा यांनी सांगितले की, आरोपीचा मोठा भाऊ दारूड्या होता.

दररोज दारू पिऊन गावकरी आणि नातेवाइकांना शिवीगाळ करत होता. त्यामुळे सगळेच त्रासले होते. त्याचा लहान भाऊ यामुळे चिडला होता. घटनेच्या दिवशीही मोठा भाऊ दारू पिऊन घरी आला होता.

त्यानंतर त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. चिडलेल्या लहान भावाने त्याची गळा आवळून हत्या केली.

## सोनसाखळी चोरांवर 'मोक्का'



सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात दोघांच्या टोळीवर पुणे पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यानुसार (मोक्का) कारवाई केली आहे. मोक्का लावलेल्या सोनसाखळीवर ७० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असून, दोन वर्षांपूर्वी त्याला अटक केली होती. त्या वेळी त्याचे वडगाव शेरी येथे हॉटेल व लातूर येथे अलिशान बंगला असल्याचे आढळून आले होते. राजाभाऊ उर्फ राजूखेमू राठोड (वय ३६, रा. वडगाव शेरी, मूळ-औसा, मूळ- लातूर), नागेश बंडगर (रा. रायबाग, बेळगाव) अशी 'मोक्का'नुसार कारवाई केलेल्यांची नावे आहेत. ऑक्टोबर २०२० मध्ये बाणेर परिसरात दुचाकीवरून आलेल्या दोघांनी एका रिक्षाचालकाच्या गळ्यातील सोन्याची साखळी हिसकावून नेली होती. या गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी राठोड व बंडगर या दोघांना अटक केली. त्या वेळी राठोडने टोळी करून साथीदार बंडगरच्या मदतीने सोनसाखळी चोरी, जबरी चोरी, बॅग लिफ्टिंग अशा प्रकारचे गुन्हे करीत असल्याचे समोर आले. त्यामुळे या दोघांविरोधात 'मोक्का'ची कारवाई करण्यासाठीचा प्रस्ताव वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक शेवाळे यांनी उपायुक्त पंकज देशमुख यांच्यामार्फत वरिष्ठांकडे पाठविला होता. त्यानंतर पूर्व विभागाचे अतिरिक्त आयुक्त नामदेव चव्हाण यांनी या दोघांच्या टोळीवर 'मोक्का'नुसार कारवाई करण्यास मंजुरी दिली आहे. या प्रकरणी सहायक पोलिस आयुक्त रमेश गलांडे अधिक तपास करीत आहेत.

राजाभाऊ राठोड सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर ७० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. सप्टेंबर २०१८ मध्ये त्याला अटक करण्यात आली. त्या वेळी त्याने वडगाव शेरी परिसरात हॉटेल सुरू केल्याचे व लातूर येथे अलिशान बंगला घेतल्याचे समोर आले होते. बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याचे समोर आले आहे. प्रत्येक वेळी तो वेगळा साथीदार सोबत घेऊन चोरी करीत आहे. या वेळी त्याचा साथीदार बंडगर असून, त्याच्यावरही १० ते १५ गुन्हे दाखल आहेत.

या दोघांच्या टोळीवर 'मोक्का'नुसार कारवाई केली आहे. पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी सराईतांवर कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईला सुरुवात केली आहे. त्यानंतर सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात 'मोक्का' लावलेली ही पुण्यातील दुसरी कारवाई ठरली. यापूर्वी कोथरूड पोलिस ठाण्यातील सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात आरोपींवर मोक्का लावला होता; पण तो मोक्का कोर्टाने काढून टाकला होता.

## मराठी इन्स्टाग्राम स्टार समीर गायकवाडची आत्महत्या



मराठी नेटकऱ्यांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या समीर गायकवाड या २२ वर्षीय तरुणाने रविवारी सायंकाळी पुण्यातील राहत्या घरामध्ये गळफास लावून आत्महत्या केलीय. इन्स्टाग्रामवर समीर हा एका नावाजलेला चेहरा होता. मागील महिन्याभरामध्ये तो इन्स्टाग्रामवर प्रचंड लोकप्रिय झाला झालेला. समीरने अल्पवाधीमध्ये व्हिडीओंच्या माध्यमातून तरुणाईला आवडणाऱ्या स्टाइलमध्ये वैचारिक संदेश देण्याच्या कलेमुळे अफाट लोकप्रियता मिळवलेली. समीरच्या मृत्यूसंदर्भातील बातमी समोर आल्यानंतर इन्सटाग्रामवरील त्याच्या चाहत्यांना या बातमीवर विश्वासच बसत नाहीय.

समीर गायकवाडने वाघोली येथील केसनंद रोडवरील निकासा सोसायटीमधील आपल्या राहत्या घरात गळफास घेतला. घरातील आपल्या रुममधील पंख्याला साडीच्या सहाय्याने फास लावून समीरने आत्महत्या केली. रविवारी सायंकाळी पाचच्या सुमारास ही घटना घडली. समीरचा भाऊ प्रफुल्लने या घटनेची माहिती लोणीकंद पोलीस स्थानकामध्ये कळवली. समीरला पंख्याला लटकलेल्या अवस्थेत पाहिल्यानंतर घरच्यांनी त्याला खाली उतरवरुन तातडीने लाईफ लाईन रुग्णालयामध्ये नेलं. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. समीरने आत्महत्या का केली यासंदर्भातील कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही. समीरच्या रुममध्ये किंवा खिशामध्ये कोणतीही सुसाईड नोट मिळालेली नाही असं पोलिसांनी लोकसत्ता डॉट कॉमशी बोलताना सांगितलं आहे. या प्रकरणामध्ये आता समीरच्या भावाची आणि जवळच्या नातेवाईकांची पोलिसांकडून चौकशी केली जाणार आहे. त्यानंतरच समीरने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले यासंदर्भातील काही माहिती समोर येऊ शकेल अशी अपेक्षा व्यक्त केली जातेय.

आत्महत्येच्या दिवशीही त्याने सकाळी एक व्हिडीओ पोस्ट केला होता. त्यामुळे त्याने आत्महत्या केल्याच्या वृत्तावर अनेकांचा विश्वास बसत नाहीय. इतरांना प्रेरणादायी संदेश देणाऱ्या, अल्पावधीमध्ये लोकप्रिय झालेल्या सामीरला आत्महत्या करावीशी का वाटली असा प्रश्न अनेकजण विचारताना दिसत आहे.

पुण्यातील वाडिया कॉलेमध्ये शिकणारा समीर मागील काही काळापासून इन्टाग्रामवरील व्हिडीओंमुळे प्रचंड लोकप्रिय झाला होता. समीर त्याचा रुबाबद, भारदस्त आवाजाबरोबरच लूक्स आणि व्हिडीओमधील संदेशांमुळे लोकप्रिय झालेला. त्याच्या निधनामुळे त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.

## स्वागत करणं भोवलं; गुंड मारणेच्या ताफ्यातील 17 जणांना बेड्या; 200 जणांचा शोध सुरु



गुंड गजानन मारणे याच स्वागत करणं साथीदारांना चांगलंच महागात पडलं आहे. तळोजा कारागृहातून मारनेची सुटका होताच त्याचा समर्थनात आणि स्वागत करण्यासाठी पुणे आणि परिसरातील तब्बल २०० वाहने हजर होती. द्रुतगतिमार्गावरील उर्से टोल नाका येथील फूड मॉल येथे फटाके वाजवून आणि आरडाओरडा करून दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मारनेच्या ताफ्यातील १७ जणांना बेड्या ठोकल्या असून ११ आलिशान मोटरी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. अद्याप मुख्य आरोपी गजनन मारणे हा फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी चार पथक रवाना केली असून इतर १५०-२०० जणांचा शोध घेण्यासाठी ९ तपास पथक त्याचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आली आहेत. अशी माहिती पिंपरी-चिंचवड पोलिसांनी दिली आहे. सविस्तर माहिती अशी की, गजनन उर्फ गज्या मारणे हा नुकताच तळोजा कारागृहातून सुटला असून त्यांच्या स्वागतासाठी तब्बल २०० वाहनातून साथीदार आले होते. सुटका होताच पुणे-मुंबई द्रुतगतिमार्गावर फिल्मीस्टाईल रांगेत मोटरी चालवत एक प्रकारच वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले.

दरम्यान, उर्से टोल नाका येथील फूड मॉल इथे थांबून फटाके वाजवत आरडा ओरडा करून दहशत पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याचे चित्रीकरण ड्रोन द्वारे करण्यात आले होते. याप्रकरणी गजानन मारणे याच्यासह ताफ्यातील ३० ते ४० गाड्यांमध्ये प्रवास करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एक ड्रोन, महागड्या ११ मोटारी आणि १२ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. अद्याप २०० वाहने आणि आरोपी यांना अटक करणे बाकी असून ९ तपास पथके आरोपींच्या शोध घेण्यास रवाना करण्यात आले आहेत.

## गोळीबार करुन जीवे ठार मारनाऱ्या आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखा विरार युनिटला यश



नालासोपारा पुर्व येथील साईदया अपार्टमेंट शॉप नं. ४, क्यु अँड क्युबार समोर मोरेगान यातील फिर्यादी त्याचे शॉपच्या समोरील बाकडयावर त्याच्या मित्रासोबत बसले होते. मागील फुटपाथ वरुन अज्ञात एक इसम फिर्यादी व त्याच्या मित्राच्या दिशेनेगोळीबार करुन जखमी केले. फिर्यादी व मित्राला धारदार हत्याराने व मोठया दगडाने प्रहारकरुन गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न करुन पळुन गेले. म्हणुन आरोपी विरूद्ध तुळींजपोलीस ठाणे मध्ये गु.र नं. २२५/२०२१ भा.दं.वि. कलम ३००, ३४ सह आर्म एक्ट ३/२५, ४/२५ अन्वयेगुन्हा नोंद करण्यात आला.गुन्हयाची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकऱ्यांसह गुन्हे शाखा, युनिट-३ विरार चे पथकाने गुन्हयाचेघटनास्थळी तात्काळ भेट देवून गुन्हयाचा तांत्रीक तपास केला आणि गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन आरोपी१) वय ३४ वर्ष, रा. तुळीज, २) वय २१ वर्ष, रा. चेंबुर याना गुन्हयात अटक केली. सदर खुनाचा प्रयत्न आरोपीच्या भावाच्या खुनाच्या बदल्याचे पुर्ववैमनस्यातुन झाला असल्याचे प्राथमीक तपासात निष्पन्नझाले. गुन्ह्याचा पुढील तपास तुळींज पोलीस करीत आहेत.सदरची कामगीरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. प्रशांत वाघुडे, पोलीसउप आयुक्त, परिमंडळ-३ यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा, युनिट-३ विरार चे पोनि/प्रमोद बडाख आणि पथक यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलांना विवस्त्र करुन मारहाण, अंबरनाथमधील घटना




क्षुल्लक कारणांवरुन तीन अल्पवयीन मुलांना विवस्तर करुन अमानुष मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार अंबरानथ पश्चिमेतील चिंचपाडा भागात उघडकीस आला आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणातील मुख्य आरोपी बाबू उर्फ खोपडी अशप्पा गुंडे याला पोलिसांनी अटक केली आहे. चिंचपाडा भागात दोन वेगवेगळ्या ठिकाणी या मुलांना मारहाण केल्याचं व्हायरल व्हिडीओत स्पष्ट दिसत आहे. शुक्रवारी हा प्रकार घडला. एका मुलाला मोकळ्या मैदानात मारहाण करन जाब विचारताना आरोपी दिसत आहे. या मुलाला विवस्त्र करुन काठीने आणि ठोश्या बुक्क्याने मारहाण केली गेली. आरोपी मारहाण करत असताना त्याचे इतर साथीदार या घटनेचा व्हिडीओ तयार करत होते. क्षुल्लक कारणांवरुन ही मारहाण करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी याप्रकरणी एका आरोपीला अटक केली असून चौकशी सुरु आहे.

## कालव्यात सापडला होता तरुणीचा मृतदेह; धक्कादायक खुलासा



निफाड: तालुक्यातील आहेरगाव येथील पालखेड डाव्या कालव्यात मंगळवारी (दि.१६) कारसुळ येथील महाविद्यायीन युवती दीपिका अजय ताकाटे हिचा मृतदेह आढळला होता. दीपिकाचा चुलतभाऊ विक्रम गोपीनाथ ताकाटे याने मित्राच्या मदतीने तिचा खून केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. दीपिका व विक्रम यांच्यातील अनैतिक संबंधातूनच हा खून झाला असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

दीविकाचा मतृदेह आहेरगाव पालखेड डाव्या कालव्यात आढळला होता. पिंपळगाव पोलिसांनी अवघ्या ४८ तासात संशयित आरोपी विक्रम गोपीनाथ ताकाटे (दीपिकाचा चुलतभाऊ), त्याचा मित्र सौरभ दत्तात्रय निफाडे (रा. खडकजांब) या दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

या दोघांनी खुनाची कबुली दिली आहे. याबाबत पिंपळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विक्रम ताकाटेने मित्र सौरभसह दीपिकाला सोमवारी पिकअप गाडीत (एमएच ४१ जी २९४२) बसवून सटाणा-ताहाराबाद रस्त्यावर नेले. सोग्रस शिवारात गाडीतच दोरीने सायंकाळी साडे पाच वाजता दीपिकाचा गळा आवळून खून केला. त्यानंतर मंगळवारी पहाटे आरोपींनी युवतीचा मृतदेह आहेरगाव येथील पालखेड डाव्या कालव्यात फेकून पलायन केले. मात्र पिंपळगाव पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत खुनाचा उलगडा करीत आरोपींच्या मुसक्या आवळल्या. दोघांवर पिंपळगावात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898